चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२८ नोव्हेंबर, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपुर पोलीस दलातर्फे आयोजीत वादविवाद स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद

दिनांक २७/११/२०१९ रोजी पोलीस विभागातर्फे जिल्हयातील ११ वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी स्त्रियांकरीता सुरक्षित वातावरण निर्मीती करीता कठोर कायदे की समाज परिर्वतन आवश्यक या विषयावर वाद विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असुन सदर स्पर्धेत एकुण १११ मुलामुलींनी सहभाग घेतला होता.

सदरची स्पर्धा हि २७ नोव्हेंबर २०१९ रोजी पार पाडली असुन स्पर्धेमध्ये **स्त्रियांकरीता सुरक्षित वातावरण निर्मीती करीता समाज परिर्वतन आवश्यक** या विषयात प्रथम क्रमांक नामदेव अंकुश देवकते, शिवाजी कॉलेज राजुरा तर द्वितीय क्रमांक प्रतिक्षा अतुल वरगंटीवार, गंगाराम नाईक महाविद्यालय उमरी पोतदार यांनी मिळविला आहे. तसेच **स्त्रियांकरीता सुरक्षित वातावरण निर्मीती करीता कठोर कायदे आवश्यक** या विषयात प्रथम क्रमांक द्रुशा राजेश पाटील, नारायणा विद्यालय चंद्रपुर तर द्वितीय क्रमांक प्रशांत नामदेव मुंगरे, भवानजीभाई स्कुल चंद्रपुर यांनी पटकाविला आहे. विजेत्या स्पर्धकांना बक्षिस आणि प्रशस्तीपत्र देवुन गौरविण्यात आले आहे. विजेत्या विद्यार्थ्यांची नागपुर, परिक्षेत्रीय स्तरावर निवड झाली असुन दिनांक ४ डिसेंबर २०१९ रोजी परिक्षेत्रीय स्तराची वादविवाद स्पर्धा होणार आहे. आणि त्याठिकाणी विजेत्या स्पर्धकांची राज्यस्तरावरील वादविवाद स्पर्धेत निवड होणर आहे. राज्यस्तरावरील विजेत्यांना प्रथम पुरस्कार म्हणुन १ लक्ष रू तर द्वितीय पुरस्कार म्हणुन ५० हजार रू बक्षिस आणि इतर बक्षिस सुध्दा देण्यात येणार आहे.

बक्षिस वितरण कार्यक्रमाचे अध्यस्थानी श्री. डॉ. महेश्वर रेड्डी चंद्रपुर हे होते. अध्यक्षांनी आपल्या भाषणात सांगीतले की, चंद्रपुर जिल्हयातील विद्यार्थी हे राज्यस्तरावर चमकणार याची मला खात्री आहे. सदर स्पर्धेतील विद्यार्थ्यांनां अध्यक्षांच्या हस्ते पारितोषीक व प्रशस्तीपत्र वाटप करण्यात आले. सदर स्पर्धेला परिक्षक म्हणुंन श्री. मनोहर गव्हाड,उपविभागीय अधिकारी चंद्रपुर, श्री. शेखर देशमुख, पोलीस अधीक्षक (गृह) चंद्रपुर, डॉ. अंजली हस्तक, प्राचार्या शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, चंद्रपुर, श्री. संजय तुमराम, अध्यक्ष चंद्रपुर श्रमीक पत्रकार संघ हे होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन सहा. पोलीस निरिक्षक श्रीमती ऐर्कुके यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. प्रशांत खैरे, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांनी केले.

---